# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०२/०८/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०२/०८/२०२२ रोजी सभा सुचना क्र. ७ दि. २८/०७/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी ३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. राकेश शाह हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ४. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ५. | श्री. आनंद द. मांजरेकर | सदस्य |
| ६. | श्री. मनोज रा. दुबे | सदस्य |
| ७. | श्रीम. सुजाता य. पारधी | सदस्या |
| ८. | श्रीम. सिमा क. शाह | सदस्या |
| ९. | श्री. जयेश भानुदास भोईर | सदस्य |
| १०. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| **११.** | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| **१२.** | श्रीम. अर्चना अ. कदम | सदस्या |
| **१३.** | श्रीम. कुसुम सं. गुप्ता | सदस्या |
| **१४.** | श्रीम. मर्लिन म. डिसा | सदस्या |
| १५. | श्री. अशरफ मो. शेख | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |

मा. सभापती :-

सचिवांनी सभेला सुरूवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०२/०८/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. 94, बाजार फी वसुली निविदांबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. 28/06/2022 रोजीचे तहकुब प्र.क्र. 73 व दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्र.क्र. 80)

शानु गोहिल :-

| अ.क्र. | विभाग | निर्धारीत रक्कम | ठेकेदाराचे नाव | बोली लावलेली रक्कम | टेंडर आय डी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | भाईंदर पुर्व | 2,43,93,512/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 2,44,18,512/- | 2022_MH-12399 |
| 2. | मिरा रोड ते चेणा | 2,56,38,820/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 2,56,63,820/- | 2022_MH-12408 |
| 3. | भाईंदर पश्चिम | 2,31,47,198/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 2,31,72,198/- | 2022_MH-13026 |
| 4. | मुर्धा ते उत्तन | 15,90,953/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 16,15,953/- | 2022_MH-12770 |

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात नमूद केल्यानुसार श्री गाजानन इंटरप्रायजेस यांनी अटीशर्तीत नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता केली असल्याचे बाजार फी विभागाचे स्पष्ट मत असुन एकूण 4 क्षेत्रात फक्त एकच अभिकर्त्यानी सहभाग नोंदविला असला तरी नियमानुसार निविदा, निविदेला मुदतवाढ व फेरनिविदा या सर्व प्रक्रिया पुर्ण केल्याने तसेच महानगरपालिकेचे आर्थिक हित पाहता सदर विषयास मनपा निवड समितीने दि. 19-06-2022 रोजी दिलेल्या मान्यतेनुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

प्रकरण क्र. 94 :-

बाजार फी वसुली निविदांबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. 28/06/2022 रोजीचे तहकुब प्र.क्र. 73 व दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्र.क्र. 80)

ठराव क्र. 79 :-

| अ.क्र. | विभाग | निर्धारीत रक्कम | ठेकेदाराचे नाव | बोली लावलेली रक्कम | टेंडर आय डी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | भाईंदर पुर्व | 2,43,93,512/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 2,44,18,512/- | 2022_MH-12399 |
| 2. | मिरा रोड ते चेणा | 2,56,38,820/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 2,56,63,820/- | 2022_MH-12408 |
| 3. | भाईंदर पश्चिम | 2,31,47,198/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 2,31,72,198/- | 2022_MH-13026 |
| 4. | मुर्धा ते उत्तन | 15,90,953/- | मे. श्री गजानन इंटरप्रायजेस | 16,15,953/- | 2022_MH-12770 |

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात नमूद केल्यानुसार श्री गाजानन इंटरप्रायजेस यांनी अटीशर्तीत नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता केली असल्याचे बाजार फी विभागाचे स्पष्ट मत असुन एकूण 4 क्षेत्रात फक्त एकच अभिकर्त्यानी सहभाग नोंदविला असला तरी नियमानुसार निविदा, निविदेला

मुदतवाढ व फेरनिविदा या सर्व प्रक्रिया पुर्ण केल्याने तसेच महानगरपालिकेचे आर्थिक हित पाहता सदर विषयास मनपा निवड समितीने दि. 19-06-2022 रोजी दिलेल्या मान्यतेनुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल          अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 95, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा प्रकल्प येथे लिचेटवर प्रक्रिया प्रकल्प कामास एका वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्रकरण क्र. 82)

मनोज दुबे :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प आहे. सदर ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या जमा असलेल्या कचऱ्यापासुन निघणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करणे कामी मे. राठोड असोसिएट्स जेव्ही तर्फे मे. मोवी इकोसर्व्हे प्रा.लि. यांना जा.क्र.मनपा/साबां/कार्या/161/2021-22 दि.26/07/2021 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामाची निविदा 5 वर्षाची आहे.

उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया ठिकाणी असलेल्या जुन्या जमा असलेल्या कचऱ्यापासुन निघणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करणे या कामासाठी 1 वर्षासाठी कार्यादेश देण्यात आलेला असुन त्याची मुदत दि.25/07/2022 पर्यंत आहे.

ठेकेदारासमवेत झालेल्या करारनाम्यातील अट क्र. 3.1 नुसार दरवर्षी उपलब्ध तरतुदीनुसार व मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन मुदतवाढीचे नुतनीकरण करण्यात यावे असे नमुद केले आहे. सदर कामी सन 2022-23 या आर्थिक वर्षात अंदाजे रु.1,66,72,500/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी “लिचेट प्रक्रिया व इतर कामे" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. सदर कामी होणाऱ्या खर्चास व 1 वर्षाची मुदतवाढ मिळणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

शर्मिला बगाजी :-

लिचेटच्या प्रक्रियेच्या निविदेला आपण मान्यता दिलेली परंतु अतिरिक्त लिचेट जे शेतामध्ये जाते त्याच्याबद्दल विचारपूस करुन लिचेटचा अगोदर पण विषय होता. तो खाडी मार्गे बाहेर निघतो तो वे त्याच्यामध्ये इन्क्लूड करावा. त्यामुळे आपल्या शेतीचे नुकसान होणार नाही त्याच्यासाठी गटार बांधण्यात यावे.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

ते करता येईल.

प्रकरण क्र. 95 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा प्रकल्प येथे लिचेटवर प्रक्रिया प्रकल्प कामास एका वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्रकरण क्र. 82)

ठराव क्र. 80 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प आहे. सदर ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या जमा असलेल्या कचऱ्यापासुन निघणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करणे कामी मे. राठोड असोसिएट्स जेव्ही तर्फे मे. मोवी इकोसर्व्हे प्रा.लि. यांना जा.क्र.मनपा/साबां/कार्या/161/2021-22 दि.26/07/2021 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामाची निविदा 5 वर्षाची आहे.

उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया ठिकाणी असलेल्या जुन्या जमा असलेल्या कचऱ्यापासुन निघणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करणे या कामासाठी 1 वर्षासाठी कार्यादेश देण्यात आलेला असुन त्याची मुदत दि.25/07/2022 पर्यंत आहे.

ठेकेदारासमवेत झालेल्या करारनाम्यातील अट क्र. 3.1 नुसार दरवर्षी उपलब्ध तरतुदीनुसार व मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन मुदतवाढीचे नुतनीकरण करण्यात यावे असे नमुद केले आहे. सदर कामी सन 2022-23 या आर्थिक वर्षात अंदाजे रु.1,66,72,500/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी “लिचेट प्रक्रिया व इतर कामे" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. सदर कामी होणाऱ्या खर्चास व 1 वर्षाची मुदतवाढ मिळणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मनोज दुबे अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 96, मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी रस्त्यालगत पे ॲण्ड पार्क सुविधा (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेकामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्रकरण क्र. 85)

मनोज दुबे :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यामध्ये पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेकामाकरीता नमूद केलेली स्थळांमध्ये गाडया पार्क करणे संयुक्तीक होणार नाही. या ठिकाणी ग्रामपंचायत काळापासुनच्या इमारती असुन सदर निविदेस मंजूरी दिल्यास नागरीक व ठेकेदारांमध्ये मोठया प्रमाणात वाद होण्याची दाट शक्यता निर्माण होणार आहे. यामुळे सदर निविदेस मंजूरी दिल्यास महानगरपालिकेस नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागणार असुन याबाबत महानगरपालिकेस नागरीकांकडून रोज तक्रारी प्राप्त होणार असल्याने अशा स्थळांमध्ये बदल करून नविन स्थळांसह सदरची निविदा नव्याने करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुरेश खंडेलवाल :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

सुरेश खंडेलवाल :-

मा. सभापती महोदय मागच्या स्टॅन्डिंगमध्ये मी एक प्रश्न उचलला होता आजपर्यंत ट्राफीक डिपार्टमेंटचे जे टोईंग माझ्या माहितीप्रमाणे त्या लोकांनी एक रुपया इथे जमा केला नाही. पालिकेचे पैसे इथे जमा करायला पाहिजे त्यांनी जर जमा केले नसेल तर त्यांच्यावर काय कारवाई केली. नाही केली तर काय करणार सोडणार का ते लोक रेव्हेन्यू गोळा करतात ते त्याची रेव्हेन्यू आणत नाही. पालिकेच्या नफा नुकसानासाठी आम्ही बसले आहोत त्याची आम्हाला माहिती पाहिजे.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

हा विषय वेगळा आहे.

सुरेश खंडेलवाल :-

माझ्या प्रभागात तुम्ही मेन्शन केले आहे की 9 ठिकाणी पे अँन्ड पार्क होणार.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

तो महासभेचा निर्णय आहे. तुम्हाला निविदा मंजूर ना मंजूर एवढेच बोलायचे आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महासभेचा ठराव वाचा. महासभेमध्ये पे ॲन्ड पार्कसाठी टेंडर काढले आहे. पण त्याची जागा कोण निश्चित करणार. निश्चिती बाबतचा अभिप्राय महासभेसमोर ठेवणार काही नाही. आपण पे ॲन्ड पार्कसाठी निविदासाठी..........

मा. अतिरिक्त आयुक्त :-

जागेसहीत मंजूर केले आहे. महासभेने निर्णय घेतल्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे.

हसमुख गेहलोत :-

विषय असा आहे आपण जे गोळा करतात त्याची पध्दत कशी आहे त्याची माहिती द्या.

जयंतीलाल पाटील :-

एकच विषय आहे तर सर्व सदस्यांना माहिती देण्यात यावी.

दिपक खांबित :-

मा. सभापतींच्या परवानगीने हा विषय मागच्या सभेत घेतला होता टोईंगच्या दोन गाड्या दिल्या आहेत त्याचे पैसे वसूल झाले की नाही ह्याबाबत आयुक्त साहेबांनी मिटींग घेतली आणि वाहन विभागाने वाहतूकचे थांबे साहेब आहेत त्यांना पत्र दिले आहे की ह्या ज्या गाड्या दिल्या आहेत त्याच्या कारवाईचा 50 टक्के पैसे आम्हाला जमा करण्यात यावे. आम्ही त्याचा पाठपूरावा करतो ते पैसे जमा होतील त्यांनी सांगितले की आमच्याकडे कोणी मागणी केली नाही म्हणून आम्ही पैसे दिले नाहीत आता आम्ही 50 टक्के पैसे देतो.

सुरेश खंडेलवाल :-

मा. सभापती महोदय मी पत्र दिले की 2-2 टोईंगची व्हॅन आपण दिल्यानंतर 2 लाख भाड दिल्यानंतर कारवाई का होत नाही. खांबित साहेब आपले असे ठरले होते की ह्यांनी आता खूप मोठी कारवाई केली आहे. टोईंगचे रोजचे पैसे गोळा होतात आपल्या पालिकेचा जो हिशोब होता 50-50 तसे तुम्ही त्यांना पत्र द्या आणि माहिती घ्या की आजपर्यंत किती गोळा झाले.

मा. सभापती :-

आता पत्र दिले ना.

प्रकरण क्र. 96 :-

मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी रस्त्यालगत पे ॲण्ड पार्क सुविधा (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेकामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्रकरण क्र. 85)

ठराव क्र. 81 :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यामध्ये पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेकामाकरीता नमूद केलेली स्थळांमध्ये गाडया पार्क करणे संयुक्तीक होणार नाही. या ठिकाणी ग्रामपंचायत काळापासुनच्या इमारती असुन सदर निविदेस मंजूरी दिल्यास नागरीक व ठेकेदारांमध्ये मोठया प्रमाणात वाद होण्याची दाट शक्यता निर्माण होणार आहे. यामुळे सदर निविदेस मंजूरी दिल्यास महानगरपालिकेस नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागणार असुन याबाबत महानगरपालिकेस नागरीकांकडून रोज तक्रारी प्राप्त होणार असल्याने अशा स्थळांमध्ये बदल करून नविन स्थळांसह सदरची निविदा नव्याने करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मनोज दुबे अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 97, निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्रकरण क्र. 87)

आनंद मांजरेकर :-

| अ.क्र. | टेंडर आयडी | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 791353_1 | मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी बसशेल्टर, जेष्ठ नागरीक कट्टा; विश्रांतीकट्टा बांधणे. (मुलभुत सोयीसुविधांचा विकास<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br><br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. श्री इंटरप्रायझेस | रु.1,78,57,144/-<br><br>15.0000 % जास्त दराने<br>दर वाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकिय दराने<br>17.0000 % जास्त दराने<br>20.0000 % जास्त दराने |

वरील कामाच्या निविदेच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार जी.एस.टी. रकमेसह ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

मनोज दुबे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 97 :-

निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. 19/07/2022 रोजीचे तहकुब प्रकरण क्र. 87)

ठराव क्र. 82 :-

| अ.क्र. | टेंडर आयडी | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 791353_1 | मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी बसशेल्टर, जेष्ठ नागरीक कट्टा; विश्रांतीकट्टा बांधणे. (मुलभुत सोयीसुविधांचा विकास<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br><br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. श्री इंटरप्रायझेस | रु.1,78,57,144/-<br><br>15.0000 % जास्त दराने<br>दर वाटाघाटीनंतर<br>अंदाजपत्रकिय दराने<br>17.0000 % जास्त दराने<br>20.0000 % जास्त दराने |

वरील कामाच्या निविदेच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार जी.एस.टी. रकमेसह ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. आनंद मांजरेकर        अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 98, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने उद्यान अधिक्षक पुरवठा करण्याबाबत.

सुजाता पारधी :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील कामकाज पाहता अतिरिक्त 02 उद्यान अधिक्षक (Out Sourcing) ठेकापध्दतीने मे. शाईन मेन्टेंनन्स सर्विस प्रा.लि. यांच्याकडुन मंजुर दराने उपलब्ध करून घेणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.04/07/2022 रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार मे.शाईन मेन्टेंनन्स सर्विस प्रा.लि यांना दि.11/07/2022 रोजी 02 अतिरिक्त उद्यान अधीक्षक ठेका पध्दतीने उपरोक्त दराप्रमाणे पुरवठा करणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रतिमाह दराचा तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | पदनाम | संख्या | किमान वेतन दर (प्रति कर्मचारी | सर्व्हिस चार्जस/प्रशासकीय चार्जस (प्रति कर्मचारी | एकुण रक्कम (4 + 5) (प्रती कर्मचारी) | एकुण वार्षिक खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | उद्यान अधिक्षक (ठेका) | 2 | रु.25,880/- | रु.519/- | रु.26,399/- | रु.6,33,576/- |
| एकुण | | 2 | | | | रु.6,33,576/- |

मे.शाईन मेन्टेंनन्स सर्विस प्रा.लि यांना यापुर्वी देण्यात आलेल्या दि.18/01/2022 रोजीच्या कार्यादेशात देण्यात आलेल्या मुदतीपर्यंत अतिरिक्त 02 उद्यान अधिक्षक (Out Sourcing) ठेकापध्दतीने पुरवठा करणेबाबत वरील तक्त्याप्रमाणे होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 98 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने उद्यान अधिक्षक पुरवठा करण्याबाबत.

ठराव क्र. 83 :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील कामकाज पाहता अतिरिक्त 02 उद्यान अधिक्षक (Out Sourcing) ठेकापध्दतीने मे. शाईन मेन्टेंनन्स सर्विस प्रा.लि. यांच्याकडुन मंजुर दराने उपलब्ध करून घेणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.04/07/2022 रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार मे.शाईन मेन्टेंनन्स सर्विस प्रा.लि यांना दि.11/07/2022 रोजी 02 अतिरिक्त उद्यान अधीक्षक ठेका पध्दतीने उपरोक्त दराप्रमाणे पुरवठा करणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रतिमाह दराचा तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | पदनाम | संख्या | किमान वेतन दर (प्रति कर्मचारी | सर्व्हिस चार्जस/प्रशासकीय चार्जस (प्रति कर्मचारी | एकुण रक्कम (4 + 5) (प्रती कर्मचारी) | एकुण वार्षिक खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | उद्यान अधिक्षक (ठेका) | 2 | रु.25,880/- | रु.519/- | रु.26,399/- | रु.6,33,576/- |
| एकुण | | 2 | | | | रु.6,33,576/- |

मे.शाईन मेन्टेंनन्स सर्विस प्रा.लि यांना यापुर्वी देण्यात आलेल्या दि.18/01/2022 रोजीच्या कार्यादेशात देण्यात आलेल्या मुदतीपर्यंत अतिरिक्त 02 उद्यान अधिक्षक (Out Sourcing) ठेकापध्दतीने पुरवठा करणेबाबत वरील तक्त्याप्रमाणे होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. सुजाता पारधी    अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 99, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय विमा योजना लागू करणेबाबत.

मर्लिन डिसा :-

दरवर्षी कंपनी चेंज होते का?

मा. अतिरिक्त आयुक्त :-

कर्मचाऱ्यांचा विषय आहे.

मर्लिन डिसा :-

मेडीक्लेम 3 वर्ष किंवा 5 वर्षासाठी देऊ शकत नाही का? बिच में जो गॅप गिरता है|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

वार्षिकच असते.

शानू गोहिल :-

3 वर्षाचा द्यायला पाहिजे.

मा. सभापती :-

हा तीन साल का देना चाहिए|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

आपले कर्मचारी जास्त आहेत.

जयंतीलाल पाटील :-

आरोग्याचे साफसफाईचे कर्मचाऱ्यांचा मेडीक्लेम आहे का?

मा. अतिरिक्त आयुक्त :-

हो आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझ्या वॉर्डमधला एक कर्मचारी साफसफाईचा आजारी पडला त्याची फॅमेली त्याला टेंभा हॉस्पीटलमध्ये घेऊन गेले तर ते बोलले इथे फक्त परमनन्ट कर्मचाऱ्यांसाठी आहे.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

त्यांच्यासाठी कामगार हॉस्पीटल आहे ठाणा, बोरीवली इथे यांचे हॉस्पीटल असते.

जयंतीलाल पाटील :-

लांब जायला लागेल.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

जिथे कामगार हॉस्पीटल आहेत तिथे जायला लागेल.

जयेश भोईर :-

| अ.क्र. | कंपनीचे नाव | विमा कंपनी | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|
| 1. | M/S. CHOICE INSURANCE BROKING INDIA PRIVATE LIMITED | UNIVERSAL SOMPO GENERAL INSURANCE | रु.13,143.37/- |

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मिराभाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना ग्रुप वैद्यकीय विमा योजना लागु करणेकरीता M/S. CHOICE INSURANCE BROKING INDIA PRIVATE LIMITED या कंपनीने वाटाघाटी अंती दिलेल्या दराच्या निविदा स्विकृतीपत्रास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

मनोज दुबे :-

माझे अनुमोदन आहे.

प्रकरण क्र. 99 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय विमा योजना लागू करणेबाबत.

ठराव क्र 84 :-

| अ.क्र. | कंपनीचे नाव | विमा कंपनी | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|
| 1. | M/S. CHOICE INSURANCE BROKING INDIA PRIVATE LIMITED | UNIVERSAL SOMPO GENERAL INSURANCE | रु.13,143.37/- |

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मिराभाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना ग्रुप वैद्यकीय विमा योजना लागु करणेकरीता M/S. CHOICE INSURANCE BROKING INDIA PRIVATE LIMITED या कंपनीने वाटाघाटी अंती दिलेल्या दराच्या निविदा स्विकृतीपत्रास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. जयेश भोईर        अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 100, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचे व मांजरांचे निर्बिजीकरण व लसीकरण आणि जखमी व पिसाळलेले कुत्रे व मांजरांवर औषधोपचार, बंदोबस्त करणे कामाच्या निविदा मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

शानू गोहिल :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मा. नगरसेवक व नागरीकांच्या मोकाट कुत्रे व मांजरी आदि जनावराबाबतच्या तक्रारींच्या प्रमाणात वाढ होत आहे. सदर तक्रारी लक्षात घेता महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्रे, मांजरे यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करणे कामाच्या नव्याने ऑनलाईन निविदा मागविणे आवश्यक आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे या लेखाशिर्षाखाली ७५.०० लाख तरतुद करण्यात आली असून सदर कामास ५० लक्ष पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

या कारणी ही सभा २ वर्षाकरिता शहरातील मोकाट कुत्रे, मांजरे यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करणे आणि जखमी पिसाळलेले कुत्रे व मांजरांवर औषधोपचार, बंदोबस्त करणे कामाच्या ऑनलाईन निविदा मागविणे कामी व त्याकरीता रू. ५० लक्ष पर्यंतच्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 100 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचे व मांजरांचे निर्बिजीकरण व लसीकरण आणि जखमी व पिसाळलेले कुत्रे व मांजरांवर औषधोपचार, बंदोबस्त करणे कामाच्या निविदा मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 85 :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मा. नगरसेवक व नागरीकांच्या मोकाट कुत्रे व मांजरी आदि जनावराबाबतच्या तक्रारींच्या प्रमाणात वाढ होत आहे. सदर तक्रारी लक्षात घेता महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्रे, मांजरे यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करणे कामाच्या नव्याने ऑनलाईन निविदा मागविणे आवश्यक आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे या लेखाशिर्षाखाली ७५.०० लाख तरतुद करण्यात आली असून सदर कामास ५० लक्ष पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

या कारणी ही सभा २ वर्षाकरिता शहरातील मोकाट कुत्रे, मांजरे यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करणे आणि जखमी पिसाळलेले कुत्रे व मांजरांवर औषधोपचार, बंदोबस्त करणे कामाच्या ऑनलाईन निविदा मागविणे कामी व त्याकरीता रू. ५० लक्ष पर्यंतच्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल                अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 101, निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

हसमुख गेहलोत :-

101,102,103,104,105,106 हे सर्व विषय पर्यटक विकास योजना अंतर्गत आहे. मी सांगू इच्छितो की शासनानी गाईडलाईन नक्की केली आहे. 25/7/2022 ला जी.आर. फयनल केला आहे. त्यांना वर्क ऑर्डर दिलेली नाही. जी काम चालू झालेली नाहीत ती यशास्थिती कशी ठेवण्यात यावी पुढील कारवाई कु नये. ह्या विषयासाठी शासनाच्या गाईडलाईन्सच्या हिशोबाने स्टे दिला आहे. तर शासनाच्या जी.आर नुसार ही काम थांबविण्यात यावी अशी विनंती आहे.

दिपक खांबित :-

आम्ही हे यायच्या अगोदर गोषवारा दिला होता. आता ह्याच्यावर स्थगिती आहे. शासनाकडून मंजूर होईल तेव्हा आपण करु.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 107, निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

मनोज दुबे :-

| अ.क्र. | टेंडर आयडी | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 805461_1 | मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात पडणारे खड्डे Jet Patcher Machine द्वारेबुजविणे.<br><br>मे. अंजनीकृपा लॉगिस्टीक प्रा.लि.,<br><br>मे. आस्था आशिर्वाद बिल्डर,<br>मे. एस.टी.जी. इन्फ्रास्ट्रक्चरप्रा.लि. | रु.4,46,42,857/-<br><br>2.2000 % जास्त दराने दरवाटाघाटीनंतर अंदाजपत्रकिय दराने<br><br>7.7300 % जास्त दराने<br>5.2500 % जास्त दराने |

वरील कामाच्या निविदेच्या दरास महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार जी.एस.टी. रकमेसह ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

अशरफ शेख :-

आपण 4.50 कोटी खर्च करुन नविन मशिन घेतो का?

दिपक खांबित :-

ही ओल्ड मिक्स टेक्नोलॉजी आहे. तुमच्या वॉर्डमध्ये काम केले आहे. बारीश में भी काम कर सकते है|

जयंतीलाल पाटील :-

माझ्या वॉर्डमध्ये ही मशिन आलीच नाही.

प्रकरण क्र. 107 :-

निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. 86 :-

| अ.क्र. | टेंडर आयडी | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 805461_1 | मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात पडणारे खड्डे Jet Patcher Machine द्वारेबुजविणे.<br><br>मे. अंजनीकृपा लॉगिस्टीक प्रा.लि., | रु.4,46,42,857/-<br><br>2.2000 % जास्त दराने दरवाटाघाटीनंतर अंदाजपत्रकिय दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मे. आस्था आशिर्वाद बिल्डर,<br>मे. एस.टी.जी. इन्फ्रास्ट्रक्चरप्रा.लि. | 7.7300 % जास्त दराने<br>5.2500 % जास्त दराने |

वरील कामाच्या निविदेच्या दरास महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार जी.एस.टी. रकमेसह ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मनोज दुबे अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 108, मा. आयुक्त सो यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणेबाबत (भांडार विभाग) -- सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयक व त्याकरीता आवश्यक असलेली प्री-प्रिंटेड स्टेशनरी छपाई करणेबाबत.

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 108 :-

मा. आयुक्त सो यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणेबाबत (भांडार विभाग) -- सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयक व त्याकरीता आवश्यक असलेली प्री-प्रिंटेड स्टेशनरी छपाई करणेबाबत.

ठराव क्र. 87 :-

**विषय क्र. 1 :- सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयक व त्याकरिता आवश्यक असलेली प्री-प्रिंटेड स्टेशनरी छपाई करणेबाबत.**

सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयक व त्याकरिता आवश्यक असलेली प्री-प्रिंटेड स्टेशनरी छपाई करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन मनपाच्या संकेत स्थळावर जाहीर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र असलेले दरपत्रकधारक मे. गजानन इमेजिंग प्रिंट सोल्युशन यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने दरपत्रकेतील दरास मा.आयुक्त सो. दि.28/4/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयक व त्याकरिता आवश्यक असलेली प्री-प्रिंटेड स्टेशनरी छपाई करणेकामी अंदाजित रु. 5,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र. 2 :- मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन मनपाच्या संकेत स्थळावर जाहीर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र असलेले दरपत्रकधारक मे. राज इंटरप्रायजेस यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने दरपत्रकेतील दरास मा.आयुक्त सो. दि.04/02/2022 रोजी मान्यता

दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजित रु. 1,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये मा.स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 109, मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी संगणक संच पुरवठा करणे कामी निविदेचे अवलोकन करणे

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 109 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी संगणक संच पुरवठा करणे कामी निविदेचे अवलोकन करणे

ठराव क्र 88 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी संगणक संच पुरवठा करणे कामाबाबत जा.क्र.मनपा/जनसंपर्क/३३८/२०२१-२२ दि.२८/१०/२०२१ रोजी (GeM) पोर्टलदवारे (GEM/2021/B/1632536) ई-निविदा मागविण्यात आलेली आहे. याकामी निविदेस अल्प प्रतिसाद मिळून दोन निविदा प्राप्त झाल्या असल्याने सदर कामी प्रथम मुदतवाढ दि. १७/११/२०२१ पर्यत देण्यात आली असता याकामी एकूण ४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकाचा तांत्रिक लिफाफा उघडणेस मा. उपायुक्त (संगणक) यांची दि.२५/११/२०२१ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. संदर्भ क्र. ०३, ०४, ०५ व ०६ अन्वये प्राप्त निविदाधारक M/s. Naupad., M/s.B.J. Automation., M/s.KJM Group System Solution., व M/s.Digitech Electronic Systems Pvt.Ltd., यांना निविदेतील कागदपत्र सादर करणेबाबत ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. निविदाधारक M/s.B.J. Automation., व M/s.KJM Group System Solution., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर केल्याने ते पात्र ठरले आहेत. तसेच निविदाधारक M/s. Naupad., व M/s.Digitech Electronic Systems Pvt.Ltd., यांना ई-मेलद्वारे कळवूनही कागदपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरले आहेत.

शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि. १ डिसेंबर २०१६ मुद्दा क्र.४.४.३.१ अन्वये निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तसेच मुद्दा क्र.४.४.३.१ (ब) नुसार दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-)२० टक्के ते (+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. वरील नियमानुसार ०४ निविदा प्राप्त असून दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र असल्याने निविदाधारक M/s.B.J. Automation., व M/s.KJM Group System Solution.,यांचा दराचा लिफाफा उघडणेस मा. आयुक्त सो. यांची दि.१६/०२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. पात्र निविदाधारकांचा दराचा लिफाफा उघडणेत आलेला असून कार्यादेश प्रदान करणेस Bid Life Cycle ९० दिवसांसाठी वाढविणेस आवश्यक आहे. Bid Life Cycle वाढविणेस मा. उपायुक्त (संगणक)

यांची दि.०२/०३/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. पात्र निविदाधारक M/s.B.J Automation., व M/s.KJM Group System Solution.,यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | एकूण नग | M/s.B J Automation., (L1) | | M/s.KJM Group System Solution.,(L2) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर प्रति नग | एकूण | दर प्रति नग | एकूण |
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी संगणक संच पुरवठा करणे कामी | 33 | 57,500/- (GST सह) | 18,97,500/- (GST सह) | 65,844/- (GST सह) | 21,72,852/- (GST सह) |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता पात्र निविदाधारक M/s.B.J Automation., यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर निविदाधारक M/s.KJM Group System Solution.,यांच्या तुलनेत कमी आहेत. निविदाधारक M/s.B.J Automation., यांचे दर वाजवी असल्याने M/s.B.J Automation., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मान्यता देऊन कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. निविदा निवड समितीस दि.१४/०३/२०२२ रोजी शिफारस करण्यात आलेली असून मा. आयुक्त सो. यांचे दि.३०/०३/२०२२ रोजीच्या मंजूरीने करारनामा करणेत आलेला आहे. सदर कामी रु. १८,९७,५००/- (GST सह) वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(ड) नुसार मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात येत आहे.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 110, मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागातील Salary Administrative Online Module विकसित करुन पुरवठा करणेकामी निविदेचे अवलोकन करणे.

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 110 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागातील Salary Administrative Online Module विकसित करुन पुरवठा करणेकामी निविदेचे अवलोकन करणे.

ठराव क्र. 89 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागातील Salary Administrative Online Module विकसित करुन पुरवठा करणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि. १५/१२/२०२१ रोजी दरपत्रक मागविणेस मंजुरी दिलेली आहे. मा. आयुक्त सो.यांच्या मंजुरीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागातील Salary Administrative Online Module विकसित करुन पूरवठा करणेकामी दरपत्रक सादर करणेबाबत दि.१४/०२/२०२२ रोजी नोटीस बोर्डावर व मनपाच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द करुन दि.२४/०२/२०२२ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात आले. सदर कामी प्रतिसाद न मिळाल्याने दि.१७/०३/२०२२ रोजी वृत्तपत्रात व मनपाच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द करुन दि.२९/०३/२०२२ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत पुनच्छ दरपत्रक मागविणेत आले. त्यानुसार याकामी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त निविदाधारक M/s.

Bhavya Enterprises., व M/s. Kanifa Contech., यांनी अटीशर्तीनुसार वैध कागदपत्र जोडलेले असल्याने ते पात्र ठरले आहेत. तसेच निविदाधारक M/s. Chaitanya Incorporation., यांनी अटीशर्तीनुसार वैध कागदपत्र जोडलेले नसल्याने ते अपात्र ठरले आहेत.

पात्र निविदाधारक M/s. Bhavya Enterprises., व M/s. Kanifa Contech., यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| Sr. No | Name of Work | M/s. Bhavya Enterprises., यांचे दरपत्रकातील दर रु. | M/s. Bhavya Enterprises., यांचे वाटाघाटीनंतरचे दर रु. | M/s. Kanifa Contech., यांचे दरपत्रकातील दर रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | Development and Implementation of Employee Salary Administrative Module (Including support for a period of 1 year) | Rs.8,39,000/- (अधिक GST) | Rs.9,50,000/- (GST सह) | Rs.10,15,000/- (अधिक GST) |
| 2. | Annual Technical Support (In percentage of the cost) (After Completion of the support period) | 25% | 10% | 25% |

लघुत्तम निविदाधारक M/s. Bhavya Enterprises., यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरास मा. निविदा निवड समितीच्या दि.१२/०५/२०२२ रोजीच्या शिफारसीनुसार मा. आयुक्त सो. यांची दि.१३/०५/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामी रु.९,५०,०००/- (GST सह) व दुस-या वर्षासाठी १०% Annual Technical Support charges रु.९५,०००/- वार्षिक खर्च होणार आहे.

उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(ड) नुसार मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 111, मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (नगरसचिव विभाग)

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 111 :-

मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (नगरसचिव विभाग)

ठराव क्र. 90 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा व मा. स्थायी समिती सभेकरिता चहा, नाश्ता, जेवण, मिनरल पाणी व इतर आवश्यक खाद्यपदार्थ पुरवठा करणेसाठी दरपत्रके मागविणेसाठी मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका सुचना फलकावर जाहिर सुचना प्रसिध्द करुन उक्त कामी दरपत्रके मागविण्यात आलेली आहेत. दरपत्रके सादर करावयाच्या मुदतीत 1) श्री. साई कॅटरर्स, 2) मे. प्रज्ञा इंटरप्राईजेस व 3) मे. श्रृती इंटरप्राईजेस या निविदाधारकांची दरपत्रके

प्राप्त झालेली आहेत. प्राप्त निविदाधाराकांपैंकी श्री. साई कॅटरर्स यांनी सादर केलेले दर हे इतर निविदाधारक यांच्या तुलनेत कमी आहेत. श्री. साई कॅटरर्स यांनी सादर केलेले दर हे सर्वात कमी असल्याने कामाचा करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामाची मुदत कार्यादेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाकरिता आहे. तसेच या कामी वार्षिक रुपये 9,95,000/- इतका खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(ड) नुसार अवलोकन करुन सदर निवीदेस मान्यता देण्यात येत आहे.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 112, मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या कामांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

मर्लिन डिसा :-

आपण एस.टी.पी. चे काम पालिकेत कधीपासून चालू केले.

सुरेश वाकोडे :-

2009 पासून चालू केली.

मर्लिन डिसा :-

सिव्हरेज टॅक्स कधीपासून लावला.

सुरेश वाकोडे :-

2011 पासून लावला.

मर्लिन डिसा :-

किती एस.टी.पी. प्लान चालू आहेत.

सुरेश वाकोडे :-

8 चालू आहेत.

मर्लिन डिसा :-

एक महिन्यापासून जास्त दिवस झाले तिथे मोठर चालत नाही. तिकडे खूप घाण येते. तिकडे सुशिक्षित लोक येऊन तिकडे आवाज करायला लागले. तिथे मिथेन गॅसचा वास येतो. त्याच्यावर तुम्ही लक्ष द्यायचे नाही का? लोक टॅक्स भरतात. सेप्टीक टॅंक भरण्यासाठी टॅंकरचे पैसे भरतात आपण सुविधा का देत नाही. तुम्ही आज तिकडे बघायला थांबले नाही तुम्ही लोकांना सुविधा कधी देणार. तुम्ही दोन वर्षापासून सांगता चालू होणार फक्त शांती पार्कची एक सोसायटी चालू आहे. शितल नगर आणि साईबाबा नगरला अजून ही फॅसिलिटी नाही लोकांनी कनेक्शन चार्जेसचे 25000 कधीपासून भरले आहेत. शितल नगर बऱ्याच प्रॉपर्टी चूकीच्या केल्या होत्या पुन्हा तो रस्ता खोदून म्हणजे पब्लीकचा पैसा असाच रस्ता खोदून मेन्टेन करायचे रिपेअर करायचे तेच काम चाललेले आहे. पैशाची उधळपट्टी कशासाठी लोक मेहनत करुन टॅक्स भरतात त्यांना तुम्ही व्यवस्थित सुविधा का देत नाही आणि आम्हाला अडीज तास का बसवले आम्ही तुम्हाला रिक्वेस्ट केली होती मॅसेज पाठवला होता तरी पण.

अशरफ शेख :-

2009 मध्ये माजी आमदार मुझफ्फर हुसैन साहेबांनी 500 कोटीची योजना आणली होती. 2011 मध्ये तुम्ही टॅक्स लावले बऱ्याच ठिकाणी अजून प्रॉपर्टी कनेक्शन झाले नाही. एका युनिटमध्ये 40 लाख

आपण खर्च करतो. 20 कोटी दरवर्षी आपण लोकांकडून घेतो. एस.टी.पी. चे पैसे घेतो आणि 2011 पासून आपण पैसे घेतो सुविधा देत नाही मग आपण पैसे कशाला घेतो.

सुरेश वाकोडे :-

मा. सभापतींच्या परवानगीने, आपण मलसुविधा लाभ कर असा टॅक्स केलेला आहे. मल सुविधा लाभ कर हा शहरामध्ये सुविधा देण्यासाठी म्हणजे प्रकल्प आणण्यासाठी गर्व्हमेंटचा फंड असतो आपला स्वत:चा फंड त्यामध्ये लावायचा असतो. ते लावण्यासाठी म्हणून तो आहे. तो फक्त आपल्या पालिकेसाठी लागू आहे असे नाहीतर बी.एम.सी., नवी मुंबई, के.डी.एम.सी. आजूबाजूच्या सर्व कार्पोरेशनला हा लाभ कर लागू आहे तिथे दोन प्रकारचे टॅक्स असतात. पहिला टॅक्स कसा असतो एखादा प्रकल्प उभा करण्यासाठी आपला फंड लागतो त्यासाठी असतो आणि दुसरा टॅक्स जेव्हा हा प्रोजेक्ट कम्पलीट झाला आणि ह्याचा मेन्टेनन्स चालू झाले की ते मेन्टेनन्स चालवण्यासाठी खर्च वसूल करण्यासाठी मलप्रवाह कर असतो आपण मल सुविधा कर लावला मलप्रवाह कर आपण रिजेक्ट केला ती सुविधा अजून सुरु झाली नाही म्हणून रिजेक्ट केला आहे.

मर्लिन डिसा :-

आता तिकडे का चालू नाही ते सांगा.

सुरेश वाकोडे :-

आपण तिथे जाऊन बघितले.

मर्लिन डिसा :-

दोन महिन्यापासून मी पाठपूरावा करते तुमचे चेंबर क्लिन होत नाही. तुम्ही फक्त लिक्वीड काढता.

सुरेश वाकोडे :-

मॅडम तुम्ही अला हजरत ग्राऊंडचे सांगता त्यामध्ये मॅग्रो लिडींगचे काम चालू आहे आणि पावसामध्ये ह्या कामाला वेग घेता येत नाही.

मर्लिन डिसा :-

मी एप्रिलपासून तिथे चक्कर मारत आहे तुम्ही मला पावसाचे कारण सांगू नका.

सुरेश वाकोडे :-

त्यामध्ये काही कनेक्शन लागले आहेत फक्त पुढची लाईन क्लिन करायची आहे तोपर्यंत लावता येत नाही.

मर्लिन डिसा :-

दोन महिने लागतात का? माझ्या सोसायटीचे सेक्रेटरी आठवड्यातून दोन वेळा जाऊन मला रिपोर्ट करतात. एक दिवस काम चालू असते तीन दिवस बंद असते.

सुरेश वाकोडे :-

तिथे आठ मिटर खाली आहे. तिथे पूर्ण लाईन बंद आहे तिथे मास्क लावून काम करायचे असते. ते रिस्की काम आहे.

मर्लिन डिसा :-

तुम्ही फक्त लिक्वीड काढता रस्त्याचे काम चालू होते तर सर्व दगड आतमध्ये गेलेले आहेत ते दगड आत कसे गेले तेव्हा एस.पी.एम.एल. डिपार्टमेंटनी लक्ष का दिले नाही.

सुरेश वाकोडे :-

रोडचे काम चालू असताना एस.पी.एम.एल. एकच एजन्सी नसते त्याच्यात अजून एजन्सी असते. दुसऱ्या एजन्सीचे काम चालू असेल त्याचे लक्ष नसते. बऱ्याच गोष्टी आपल्या पलीकडच्या असतात परंतु आपण सर्व योग्य करुन ठेवले आहे.

मर्लिन डिसा :-

तुमचा स्टाफ टेक्नीकली टेनड नाही तो श्रीवास्तव सायकलवर फिरत असतो त्याला काय नॉलेज आहे. झोन 7 च्या एस.टी.पी. प्लान्टची कॅपेसिटी किती आहे आणि किती चालू आहे.

सुरेश वाकोडे :-

17 एम.एल.डी.

मर्लिन डिसा :-

17 एम.एल.डी. ची कॅपेसिटी आहे आणि 3 एम.एल.डी चे काम चालू आहे. तुमच्या कामाचा स्पिड काय आहे. तुम्ही एवढे पैसे घेता त्यांना का करुन देत नाही.

सुरेश वाकोडे :-

लाईन गेल्यावर ऑटोमॅटीक चालू होणार.

मर्लिन डिसा :-

17 एम.एल.डी. का कॅपेसिटी और 3 एम.एल.डी का काम चल रहा है बाकी को देना नही है|

सुरेश वाकोडे :-

आपण प्रकल्प करताना पुढच्या 40 वर्षाच्या प्लानिंग प्रमाणे करतो.

मर्लिन डिसा :-

तुम्ही प्रॉपर्टी कनेक्शन करुन घेतले आहे. तर त्यांना कनेक्शन द्या.

सुरेश वाकोडे :-

सिव्हरेज लाईनमध्ये पूर्ण लाईन क्लिन झाल्याशिवाय प्रॉपर्टी कनेक्शन घेता येत नाही जे होण्यासारखे आहे. त्याचे आपण केले. लोकल लाईन क्लिन केली नाही आणि प्रॉपर्टी कनेक्शन जोडले तर प्रॉब्लेम होईल.

शानू गोहिल :-

साहेब तुम्ही पर्सनली जाऊन पाहणी करा.

सुरेश वाकोडे :-

आज मी स्वत: गेलो होतो.

मर्लिन डिसा :-

आम्ही फोन केल्यावर तुम्ही आले.

शानू गोहिल :-

आमच्याकडे 2000 ची लाईन आहे जूनी आहे ह्यांच्याकडे नविन आहे. सगळी लाईन जुनी झाली त्याचा पाईप चेंज करा. तुमच्या टेक्नीशियनला सर्व समजून सांगितले आहे तरी काही होत नाही.

सुरेश वाकोडे :-

ह्यांचा वेगळा प्रॉब्लेम आहे. एस.टी.पी. मध्ये विदाऊट परमिशन मशिन घेऊन जाणे रिस्की आहे. त्याच्यामध्ये कोणी पडले काही झाले तर डेंजरस असते.

शानू गोहिल :-

तुम्ही नगरसेवकांना बोलवा.

मा. सभापती :-

मॅडम जो कंम्पलेन्ट कर रही है वो पब्लीक बोल रही है उस हिसाब से बोल रही है इसमें आप कितना बेस्ट और जल्दी कर सकते है उसका मॅडम को आश्वासन दो|

मर्लिन डिसा :-

यह टॅक्स पेयर का मामला है| उधर जो मिथेन गॅस का बास आता है उधर आजूबाजू में छोटे बच्चे रहते है, सिनियर सिटीझ रहते है|

मा. सभापती :-

आप मॅडम आश्वासन दे दो और वो काम करो

मा. अतिरिक्त् आयुक्त् :-

मा. सभापींच्या परवानगीने बोलतो आज जेव्हा आम्ही एस.पी.एम.एल. च्या व्हिजीटला गेलो तेव्हा एस.पी.एम.एल चे कर्मचारी तिथे होते. एस.टी.पी चे मेन्टेनन्स एस.पी.एम.एल करते ते चांगल्या प्रकारे करत नाही. माझी खात्री झाली आहे आम्ही त्याला दंड करुन त्याला टर्मीनेट करुन दुसरी कंपनी नेमणार आहोत.

मर्लिन डिसा :-

आतापर्यंत किती कॉन्ट्रॅक्टर चेंज केले.

मा. अतिरिक्त् आयुक्त :-

जेव्हापासून स्टार्ट झाले तेव्हापासून एकच होता आता आम्ही दोन महिन्यात करतो.

मर्लिन डिसा :-

सबको इसका भरपाई करना पडेगा आप जाने अनजाने में लोगो के हेल्थ के साथ खेल रहे है|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

आम्हाला केंद्र सरकारची वॉर्निंग येऊन गेली. दरवर्षी त्याचे सर्टीफिकेशन असते. काही तांत्रिक बिघाडामुळे आम्ही दोन महिन्यामध्ये आम्ही एजन्सी बदलतो.

अशरफ शेख :-

आम्हाला त्यांनी सांगितले की आमचे प्लान्ट आहेत त्यांना दुरुस्तीची गरज आहे आणि ते बंद आहेत असे त्यांनी ऑन रेकॉर्ड सांगितले.

मर्लिन डिसा :-

तिकडचा स्टाफ ट्रेन नाही त्यांच्याकडे आय.डी. कार्ड नाही, कॉलीफिकेशन नाही.

अशरफ शेख :-

आम्ही सकाळी त्याला विचारले तर तो सांगतो मी फक्त ऑपरेट करतो मला काही माहित नाही.

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 112 :-

मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या कामांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

ठराव क्र. 91 :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु.) | कंत्राटदाराचे नाव | मंजूर निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकरीता पी.वी.सी. बॅरीकेड खरेदी करणे. (दरपत्रक क्र.45) | रु.6,14,000/- | मे. विंध्या ट्रेडर्स | रु.6,14,000/- |
| 2. | एम.एम.आर.डी.ए. कडून रेंटल हाऊसिंग स्किम अंतर्गत लोढा ॲक्वा या इमारती मधील मलनि:स्सारण केंद्राच्या पंपिग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (फेर निविदा क्र.42) | रु.17,83,700/- | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रा प्रा.लि. | रु.19,61,892/- |
| 3. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पंपीग स्टेशन येथे वॉल पेंटींग व डिजीटल वॉल पेंटींग करणे. (दरपत्रक क्र.65) | रू.5,22,900/- (जी.एस.टी.वगळून) | मे. श्री इंटरप्रायजेस | रु.5,17,671/- |
| 4. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कनाकिया, काशी व गोडदेव जलकुंभांवर बटरफ्लाय व्हॉल्व बसविणे व व्हॉल्व चेंबर बनविणे. (निविदा क्र.35/01) | रू.24,93,900/- | मे. गणेश डेव्हलपर्स | रु.25,44,027/- |
| 5. | भाईंदर (प), सुभाषचंद्र बोस मैदान (सर्वे क्र.777) जलकुंभ येथे क्राँकिटीकरण करणे. (निविदा क्र.44) | रु.22,06,483/- (जी.एस.टी.वगळून) | मे. रॉयल एन्टरप्रायजेस | रु.17,16,644/- |
| 6. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोर्वा ऊंच जलकुंभ येथे संरक्षक भिंत बांधणे. (दरपत्रक क्र.59) | रू.5,11,625/- (जी.एस.टी.वगळून) | मे. ओमकार इंटरप्रायजेस | रू.5,01,393/- |
| 7. | मिरारोड (पुर्व) कनाकिया जलकुंभ येथे कॉक्रिटीकरण करणे व संरक्षक भिंतीस रंगकाम करणे. (दरपत्रक क्र.56/02) | रू.8,85,579/- (जी.एस.टी.वगळून) | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रू.8,85,579/- |
| 8. | काशी जलकुंभ येथे सुरक्षारक्षक केबीन व स्टोअर रुम बांधणे. (दरपत्रक क्र.56/03) | रू.6,66,734/- (जी.एस.टी.वगळून) | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रू.6,66,734/- |
| 9. | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शांतीनगर सेक्टर 11 येथील ऊंच जलकुंभ येथे कॉक्रिटीकरण करणे. (निविदा सुचना क्र. 61/01) | रु.21,83,992/- (जी.एस.टी.वगळून) | मे. सृष्टी इन्फ्रास्ट्रक्चर | रू.16,81,674/- |
| 10. | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शांतीनगर | रु.21,72,114/- | मे. सृष्टी | रू.16,72,528/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेक्टर 07 येथील ऊंच जलकुंभ येथे कॉक्रिटीकरण करणे.<br>(निविदा सुचना क्र. 61/02) | (जी.एस.टी.वगळून) | इन्फ्रास्ट्रक्चर | |
| 11. | घोडबंदर ऊंच जलकुंभ येथे पंप पुरवठा, ऊभारणे, चाचणी घेणे व कार्यान्वित करणे.<br>(फेर-निविदा सुचना क्र. 43) | रु.24,46,800/- | मे. सुवास इलेक्ट्रिकल | रू.20,79,780/- |
| 12. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.01 अंतर्गत सार्वजनिक वापराच्या विहिरींची साफ-सफाई व दुरुस्ती करणेबाबत.<br>(निविदा सुचना क्र. 58/02) | रु.17,89,424/-<br>(जी.एस.टी.वगळून) | मे. ओमकार एन्टरप्रायजेस | रु.17,71,530/- |
| 13. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.02 ते 06 अंतर्गत सार्वजनिक वापराच्या विहिरींची साफ-सफाई व दुरुस्ती करणे.<br>(निविदा सुचना क्र. 58/03) | रु.17,01,983/-<br>(जी.एस.टी.वगळून) | मे. ओमकार एन्टरप्रायजेस, | रु.16,80,708/- |
| 14. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील माशाचापाडा व डाचकुलपाडा येथील विविध ठिकाणी विंधन विहिर (Borewell) खोदणे.<br>(निविदा सुचना क्र. 58/01) | रु.20,90,535/-<br>(जी.एस.टी.वगळून) | श्री. प्रदिप विकास वाघमारे | रु.19,86,008/- |
| 15. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहीरी (Borewell) ची वार्षिक देखभाल / दुरुस्ती करणे.<br>(निविदा सुचना क्र. 60) | रु.20,66,712/-<br>(जी.एस.टी.वगळून) | श्री. प्रदिप विकास वाघमारे | रु.18,60,247/- |

वरील निविदांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. सभापती :-

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- 4.00 वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका